अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक
कारागृह व सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य,यांचे
कार्यालय,जुनी मध्यवर्ती इमारत,२ रा मजला,पुणे-१
दुरध्वनी क्र.०२०-२६१२४८१५
फॅक्स क्र.०२०-२६१२५८७८
Email-igoffice.budget-mh@gov.in

**परिपत्रक**

जा.क्र.अपोमसंवकामनि/पुणे/कक्ष-५/कुकनिवैकर्ज/ ९७५७ /२०१८ दि.२९/१०/२०१८

**विषयः-कुटुंब कल्याण निधीतून वैद्यकीय कारणास्तव कर्जाचे प्रस्ताव सादर करताना दक्षता घेणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की,महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा विभागातील अधिकारी/कर्मचारी व त्यांचे कुटुंबातील व्यक्तींना वैद्यकीय कारणास्तव कुटुंब कल्याण निधीतून आर्थिक सहाय्य म्हणून परतफेडीचे तत्वावर व्याज आकारणीसह कर्ज रुपाने ५०,०००/- (रुपये पन्नास हजार मात्र) व रुपये २,००,०००/- (रुपये दोन लाख मात्र) इतकी रक्कम मुख्यालयाकडून मंजूर केली जाते.त्याप्रमाणे कुटुंब कल्याण निधीतून निधीची मागणीचे प्रस्ताव ब-याच कारागृहाकडून मुख्यालयास सादर केले जातात.

दिनांक १५/५/२०१८ रोजी कुटुंब कल्याण निधीच्या मध्यवर्ती समितीची बैठक आयोजित करण्यात आलेली होती सदर बैठकीमध्ये कुटुंब कल्याण निधीतून वैद्यकीय कारणास्तव मंजूर करावयाचे निधीच्या बाबत चर्चा करण्यात आलेली होती.

तरी या परिपत्रकाव्दारे सूचित करण्यात येते की,अधिकारी/कर्मचारी यांनी कुटुंब कल्याण निधीतून वैद्यकीय कारणास्तव निधीच्या मागणीचा विनंती अर्ज आपले कार्यालयास सादर केल्यास त्या प्रकरणी कार्यालय प्रमुखांनी त्या अर्जाची छाननी करुन सदरचा आजार शासन निर्णय,सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एमजी-२००५/९/प्र.क्र. १/आ-३ दिनांक १९ मार्च २००५ अन्वये तो आजार हा २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारात बसतो किंवा कसे याबाबत वैद्यकीय अधिकारी यांचेशी सल्लामसलत करुन मगच आपले अभिप्राय/शिफारशीसह प्रस्ताव उपमुख्यालया मार्फत मुख्यालयास सादर करण्यात यावा.परंतू अत्यंत तातडीची बाब असलेले प्रस्ताव परस्पर आवश्यक त्या कागदपत्रांसह मुख्यालयास सादर करण्यात यावेत.

तसेच कार्यालय प्रमुखांनी अधिकारी/कर्मचारी यांचा कुटुंब कल्याण निधीतून वैद्यकीय कारणास्तव कर्ज मिळणे बाबतचा प्रस्ताव सादर करताना सदरचा आजार शासन निर्णय,सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एमजी-२००५/९/प्र.क्र.१/आ-३ दि.१९ मार्च २००५ अन्वये तो आजार हा २७ आकस्मिक व ५ गंभीर यापैकी कोणत्या आजाराच्या प्रकारात व क्रमांकामध्ये बसतो त्याप्रमाणे वैद्यकीय अधिकारी यांचे सल्याने आजाराचा प्रकार व क्रमांक नोंदवून रक्कमेच्या शिफारसीसह प्रस्ताव सादर करण्यात यावा.तसेच वैद्यकीय अधिकारी यांनी सुध्दा वैद्यकीय प्रमाणपत्र देताना आजाराचा प्रकार व क्रमांक नमूद करुन सदरचे वैद्यकीय प्रमाणपत्र देण्यात यावे.

तरी कार्यालय प्रमुखांनी कुटुंब कल्याण निधीतून वैद्यकीय कारणास्तव कर्ज मिळणे बाबतचा प्रस्ताव सादर करताना अधिकरी/कर्मचारी यांचेकडे त्यांनी यापूर्वी घेतलेल्या कर्जाची थकबाकी शिल्लक नसलेबाबत शिफारास/अभिप्रायामध्ये नमूद करावे.जर एखादया थकबाकी असलेल्या अधिकारी/कर्मचारी यास कुटुंब कल्याण निधीतून वैद्यकीय कारणास्तव तातडीचे कर्ज हवे असल्यास त्यांचेकडे यापूर्वी घेतलेल्या कर्जाची मुद्दल व व्याजाची रक्कम एक रक्कमी त्यांचेकडून वसूल करुन मगच त्यांचा नवीन कर्ज मागणीचा प्रस्ताव मुख्यालयास सादर करावा.

तसेच ज्या आजारासाठी अधिकारी/कर्मचारी यांनी कुटुंब कल्याण निधीतून वैद्यकीय कारणास्तव कर्जाची मागणी केलेली आहे त्या आजारा संदर्भात बाहेरील रुग्णालयाकडील किंवा कारागृह रुग्णालयात वैद्यकीय उपचार घेतले बाबतची कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन वैद्यकीय प्रमाणपत्रा सोबत सादर करण्यात यावी.तरी वैद्यकीय प्रमाणपत्रासोबत वैद्यकीय उपचार घेतले/घेणार असले बाबतची कागदपत्रे सादर केल्याखेरीज कुटुंब कल्याण निधीतून वैद्यकीय कर्ज मंजूर केले जाणार नाही.

मुख्यालयाकडून अधिकारी/कर्मचारी यांना कुटुंब कल्याण निधीतून मंजूर केलेल्या कर्ज वसूली बाबत आपले कार्यालयस्तरावर स्वतंत्र नोंदवही ठेवून त्यामध्ये फक्त अधिकारी/कर्मचारी यांना मंजूर केलेल्या कर्जाची नोंद व त्यांचेकडून वसूल केली जाणा-या रक्कमेची नोंद घेवून वसूली बाबतचा अहवाल दरमहा ५ तारखेपर्यत मुख्यालयास न चुकता सादर करण्यात यावा.कुटुंब कल्याण निधीतून वैद्यकीय कारणास्तव घेतलेल्या कर्जाची वसूली करण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

**सदरचे परिपत्रक निर्गमित झाल्याचे दिनांकापासून लागू राहील.**

**(मध्यवर्ती समितीच्या मान्यतेने)**

१५-१०-१८

(डॉ.विठठल जाधव)
**विशेष पोलीस महानिरीक्षक (मुख्यालय)**
**कारागृह व सुधारसेवा,**
**महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**

**प्रति,**

**१) विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) दक्षिण विभाग,भायखळा,मुंबई**
**२) कारागृह उपमहानिरीक्षक,पुणे/नागपूर/औरंगाबाद**
**३) प्राचार्य,दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,पुणे.६**
**४) अधीक्षक,मध्यवर्ती कारागृह (सर्व) ५) अधीक्षक,जिल्हा कारागृह (सर्व)**
**६) अधीक्षक,खुले जिल्हा कारागृह (सर्व)**
**७) प्राचार्य,किशोर सुधारालय, नाशिक**
**८)अधीक्षक,रत्नागिरी विशेष कारागृह,रत्नागिरी**
**९) अधीक्षक,स्वतंत्रपूर खूली वसाहत,आटपाडी जि.सांगली**
**१०) कक्ष अधिकारी (सर्व) अपोमसंवकामनि कार्यालय,पुणे-१**

**प्रतः-उप सचिव (तुरुंग) गृह विभाग,दुसरा मजला,मंत्रालय,मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर.**